महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका
कार्यालयाचा पत्ता :- पी.एम.पी.एम.एल बिल्डींग,
[illegible] कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल kondhwa@punecorporation.org
[illegible] क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र.:- ३०७ दिनांक :- ७/४/२५

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/११४५७ दि.७/०३/२०२५

१. अपिलकर्ता
श्री. दत्ता गोडाबा जाधव,
स.नं. १, पाषाण गावठाण,
पुणे ४११०२१
मोबाईल क्र. ९८२३४३४०००

२. श्री. विजय नेवसे,
जनमाहिती अधिकारी तथा
हॉर्टीकल्चरल मिस्त्री,
पुणे महानगरपालिका

श्री. दत्ता गोडाबा जाधव
विरूध्द
श्री. विजय नेवसे, जन माहिती अधिकारी तथा हॉर्टीकल्चरल मिस्त्री, पुणे महानगरपालिका

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता श्री. दत्ता गोडाबा जाधव यांचा माहिती अधिकार अर्ज आ.क्र. ८२१५ दिनांक १३/१२/२०२४ अन्वये कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडे प्राप्त झाला.

अपिलार्थी यांनी स.नं. ४५ / ४६ कोंढवा व स.न.९ उंड्री फायनल एन.ओ.सी. तपासणे बाबतची माहिती मिळणेकामी माहिती अधिकार अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जावर श्री. विजय नेवसे, जनमाहिती अधिकारी तथा हॉर्टीकल्चरल मिस्त्री, उद्यान विभाग यांनी जा.क्र. ८००७ दि. २७/०२/२०२५ अन्वये माहितीची २० पृष्ठे जोडून पाठविली आहेत.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा आवक क्रमांक व दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास उत्तर पाठविल्याचा जावक क्रमांक व दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| ८२१५<br>दि. १३/१२/२०२४ | १३/१/२०२५ | जा.क्र. ८००७<br>दि. २७/०२/२०२५ | निरंक | जा.क्र. ८००७<br>दि. २७/०२/२०२५<br>अन्वये माहितीच्या प्रती सोबत जोडून पाठविल्या आहेत. |

Scanned with ACE Scanner

**प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण** – श्री. दत्ता गोडाबा जाधव यांनी अपिल अर्जात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे–

" माहितीच्या अधिकारात आपणाकडून रिपोर्ट फोटो सहित प्राप्त झाला आहे परंतु सदर रिपोर्ट वाचले असता त्यात माझे समाधान झाले नाही. येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत वृक्ष अधिकारी यास विनंती १) मा. वृक्ष अधिकारी २) मा सहायक उद्यान अधीक्षक ३) हॉर्टीकल्चर मिस्त्री ४) तज्ञ समिती, पुणे मनपा या सर्वांच्या समवेत आम्हाला प्रत्यक्ष जागेवर नेऊन आपण अहवालात नमूद केलेल्या सर्व गोष्टी व वृक्ष प्रत्यक्ष दाखवावेत तसेच आपण पुणे मनपाच्या नियमानुसार सर्व कामे केलीत याची खात्री करून द्यावी, तोपर्यंत कोणत्याही प्रकारची पार्ट एन ओ सी देण्यात येऊ नये व तसे झाल्यास मला हरित लवाद कोर्टात दाद मागावी लागेल. "

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा जावक क्र. दिनांक |
| २७/३/२०२५ | ७/३/२०२५ | होय | - | १०२<br>दि. ०७/०४/२०२५ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :– दि. १५/ ०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता

सुनावणीस अपिलकर्ता :– अनुपस्थित

सुनावणीस जनमाहिती अधिकारी :– उपस्थित

*जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :–*

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | स.नं. ४५ / ४६ कोंढवा व स.न.९ उंड्री फायनल एन.ओ.सी. -<br>केवल कुमार जैन व त्या संबधित विकासकांचे काम मोठ्या प्रमाणत उंड्री कोंढवा या भागात चालू आहे पण हा भाग पूर्वीचा जंगलमय होता. काम सुरु होण्यापूर्वी त्या ठिकाणचे असंख्य वृक्ष विनापरवाना काढले असावेत अशी शंका आहे. त्याची तपासणी गुगल मॅप या आपल्या विभागामार्फत करावी.<br>तसेच आपल्या नियमाप्रमाणे वृक्षांचे संवर्धन व संगोपन केले आहे का ? याचीही माहिती आम्हास मिळावी , तसेच कायदा व पुणे महानगरपालिकेचे सर्व नियम पाळलेत का ? याची पूर्ण माहिती आम्हाला देण्यात यावी. त्याशिवाय एन ओ.सी देण्यात येऊ नये ही विनंती.<br>स.नं. ४५ / ४६ कोंढवा व स.न.९ उंड्री फायनल एन.ओ.सी. तपासणे बाबतची अर्ज दाखल आहे. | जा.क्र. ८००७ दि. २७/०२/२०२५ अन्वये पुढील प्रमाणे कळविले " कार्यालयीन दस्तावेज तपासले असता अर्जदार यांनी विचारलेली माहिती असलेने मुद्दा क्र. १ व २ व ३ मधील २० पाने माहिती सोबत जोडले आहे." |

Scanned with ACE Scanner

## विवेचन

माहिती अधिकार अर्जावरील सुनावणी मध्ये अपिलार्थी हे अनुपस्थित होते तथापि श्री. विजय नेवसे, जनमाहिती अधिकारी तथा हॉर्टीक्ल्चरल मिस्त्री, उद्यान विभाग हे उपस्थित होते.

सदर सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता त्यांनी कार्यालयाकडील उपलब्ध माहिती अर्जदार यांना उपलब्ध करून दिली असल्याचे सांगितले. याबाबतची रजिस्टर ए.डी ची पोहोच पावती प्रकरणी समाविष्ट केली आहे, तसेच याबाबत अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या अपील अर्जामध्ये " रिपोर्ट फोटो सहित प्राप्त झाला आहे असे नमूद केले आहे. त्यामुळे अर्जदार यांना माहिती मिळाली असल्याचे दिसून येत आहे.

तसेच सदर अपिलाची सुनावणी घेणेबाबतचे पत्र देखील आठ दिवसापूर्वीच जा.क्र. ८७४७ दि. २१/०३/२०२५ अन्वये पाठविण्यात आले आहे. याबाबतची रजिस्टर ए.डी ची पोहोच पावती प्रकरणी समाविष्ट केली आहे.

अपिलार्थी श्री. दत्ता गोडबा जाधव हे प्रथम अपिल दि. २८.०३.२०२५ रोजी दिवशी अनुपस्थित असल्यामुळे अपिलार्थी यांनी केलेल्या विनंती अर्जानुसार जा.क्र.१०२ दि. ०७.०४.२०२५ अन्वये दि. १५.०४.२०२५ रोजी सुनावणीबाबत कळविण्यात आले होते. तथापि सदर दिवशीही श्री. दत्ता गोडबा जाधव हे अनुपस्थित होते.

सबब माहिती अधिकारात दाखल अर्जाची माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करून दिलेली आहे.

## -: आदेश :-

अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अर्जात नमूद केलेली माहिती, विवेचन मध्ये नमूद केल्याप्रमाणे अपील सुनावणी दरम्यान झालेल्या चर्चेनुसार कार्यालयाकडील उपलब्ध माहिती श्री. विजय नेवसे, जन माहिती अधिकारी तथा हॉर्टीक्ल्चरल मिस्त्री, उद्यान विभाग यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध करून दिलेली आहे.

सबब सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

( लक्ष्मण कादबाने )
अपिल प्राधिकारी तथा प्र.महा.सहा.आयुक्त
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक आणि ठिकाण: १५.०४.२०२५, पुणे.

टीप :- १.सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

Scanned with ACE Scanner